आकोट (वन्यजीव) वनविभागातील नरनाळा वनपरिक्षेत्रातील शहानूर संकुल येथे सभा मंडप हॉल व निसर्ग निर्वचन केंद्राच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्युएलपी ०९.१७/प्र.क्र.२२६/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १५ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक:-३० सप्टेंबर, २०११.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-२४ / लेखा / प्र. क्र. ९१ / प्रमं / ४५३ / २०१७-१८, नागपूर. दिनांक :- २४.०८.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारामध्ये अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक यांना रुपये २५.०० लाख पर्यंतच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्रान्वये आकोट (वन्यजीव) वनविभागातील नरनाळा वनपरिक्षेत्रातील शहानूर संकुल येथे सभा मंडप हॉल व निसर्ग निर्वचन केंद्राच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाचे रु. ७८,४२,६००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

शासन निर्णय :-

आकोट (वन्यजीव) वनविभागातील नरनाळा वनपरिक्षेत्रातील शहानूर संकुल येथे सभा मंडप हॉल व निसर्ग निर्वचन केंद्राच्या बांधकामाच्या रु. ७८,४२,६००/- च्या अंदाजपत्रकात ९% इलेक्ट्रिफिकेशन रु. ६,७८,६८३/- + १८% जीएसटीचा रु. १३,५७,३६६ /- समावेश करुन एकूण रु.९८,७८,६०७/- इतक्या रकमेस खालील अटीस अधीन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ) उपरोक्त काम जर अर्थसंकल्पाव्यतिरीक्त करावयाचे झाल्यास त्यात ५ टक्के सेंटेज चार्जेसची तरतूद मिळविण्यात यावी.

आ) काम सुरू करण्यापूर्वी सदर अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधीक्षक अभियंता यांच्याकडून साक्षांकित करुन घ्यावे.

इ) काम सुरु करण्यापूर्वी मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास सरकारी वास्तूविशारदांकडून मंजूरी घेवूनच काम सुरु करावे.

ई) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

उ) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

ऊ) प्रत्यक्ष काम करतेवेळी पार्यवरण विभाग, शासन निर्णय क्रमांक :- इएनव्ही - २०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.-१, दिनांक :- १०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरचा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौचारीक संदर्भ क्रमांक ३८८/ इमा-३, दिनांक १४.०९.२०१७ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेतांक २०१७१११५१६४२३६२५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2017.11.15 16:46:02 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
५. उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, आकोट वन्यजीव विभाग, आकोट.
६. महालोखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
७. सार्वजनिक बांधकाम विभाग(इमारत-३), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
१०.फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
११.कार्यासन फ-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ (निवडनस्ती).